Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# मराठी साहित्यातील कवयित्रींच्या कवितेतील अभिव्यक्ती

**प्रा. डॉ. जवाहर मोरे,** संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप

**प्रस्तावना**

स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेमागे सातशे वर्षाची समृध्द परंपरा आहे. कथा, किर्तन, पुराण, प्रवचन, भजन, भारूड, लळीत या संत साहित्याचे संस्कार तिच्यावर आहेत. लौकिक जीवनाच्या नव्या जाणिवांनी आधुनिक मुल्यनिधिष्ठतेची जागा घेतली. निसर्गातील तरल संवेदना, स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुता या मुल्यांचे भान येऊन वैयक्तिक व सामाजिक भावना, तीव्र सौंदर्यलालसा, प्रेमपूजन, सामाजिक रूढीचा जाच, त्याविरूध्द बंडखोरी, दुरच्या भूतकाळाचे आकर्षण, गहिरी अनिर्वचनीय उदासीनता, गुढगुंजन आणि ध्येयपूजन इ. विशेष तत्कालीन समग्र मराठी कवितेने जपले.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील स्त्रियांच्या ओवीबध्द कविता स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर बदलताना दिसतात. कुलीन संवेदनशीलता आणि प्रणायिणी वळणाचा भाव त्यावेळच्या कवयित्रींनी आपल्या कवितेतून अधोरेखित केला. इंदिरा संत, शांता शेळके, संजीवनी मराठे, पद्मा गोळे आदी कवयित्रीनी त्या काळात भावकवितेसोबतच गीतरचनाही केली, इंदिरा संतांची कविता ही आत्मसंवादी, गुढत्ववादी तर कधी प्रियकराशी संवादी होताना जाणवते. अस्सल जीवनानुभवी शब्दकळा, चित्रमय शैली रेखीव रचनातंत्र यामुळे शांता शेळकेंची कवितादेखील विलक्षण लोकप्रिय झाली. कवीच्या तुलनेत स्त्रियांची कविता उत्कट भावनांचा आविष्कार करते. अनुभवविश्व समृध्द असल्यामुळे ती कुठेही अडखळताना दिसत नाही. व्यस्त होताना ती कवितेच्या कुठल्याही आकृतिबंधाचे बंधन पाळत नाही. तर सगळया काव्यप्रकाराची हाताळणी करते, अनेक वेळा आपल्या लेखणीतून मांडणीतून निरर्थक वाड्.मयीन संकेत मोडताना दिसते. बदलत्या संस्कृतीच्या परंपरेकडे नव्या दृष्टीने पाहण्याचे बळ या कवितेने दिले, १९८०-२००० या कालखंडातील एकूणच कवितेचे आकलन करताना असे लक्षात येते की आत्मनिष्ठे कडून समूहनिष्ठेकडे काव्यजाणिवांचा लंबक स्थलांतरित होत गेलेला दिसून येतो. स्त्री कवितेतून व्यक्तिलक्षी जाणिवा समूहलक्षी जाणिवेकडे समाजसन्मुख होत. सामाजिक जाणिवा प्रकट करू लागली. तिने व्यापक भूमिका अंगीकारली व्यापक अर्थघनता कवितेला प्राप्त झाली , साहित्य हे समाजजीवनाचे दर्पण असते, त्याचबरोबर भाषा ही जीवन जगण्याची पध्दती असते, या उक्तींचा अन्वयार्थ या कालखंडातील स्त्रीवादी कवितेने पचविला यातून नित्य नवे बदल कवितेतून आविष्कृत झाले. मला काही सांगायचे पण ते कसे सांगायचे? ही अभिव्यक्त होण्याची नवी पध्दत मराठी कवितेने स्वीकारली.

**कवयित्रींच्या काव्याची शैली आणि विविध प्रयोग**

१९८० नंतरच्या स्त्रीवादी काव्याची शैली ही पारंपरिक विविध काव्यलंकार, छंद या पारंपारिक शैलीत न गुंतता आपल्या अनुभवाद्वारे त्यांनी गद्यशैलीतून मुक्त केली आहेत. हे जरी खरे असले तरी प्राचारिक शैली मात्र या कवयित्रीनी टाळली आहे. अनुभवांची शिदोरी बांधताना त्यांनी विविध शैलीचे प्रयोग ही केलेले आहेत.

या काळातील कवयित्रींनी वैशिष्ट्यपूर्ण अशा भावकविता लिहिल्या असून त्यातील प्रभा गणोरकर यांच्या भावकविता प्रासादिक शैलीतील पारंपरिक वळणाच्या आहेत. याच काळातील इंदिरा संत यांच्या 'वंशकुसुम' मधील काही कविता विशुध्द भावकवितेच्या वळणाच्या आहेत. जुन्या पिढीतील काही कवयित्रीनी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

१९८० च्या दशकातील आपले काव्यलेखन चालूच ठेवले होते. मात्र भावकवितेच्या कोषातून बाहेर पाडण्यापासून त्यांनी स्त्री जीवनासंबंधीचे नवे भान, नव्या जाणिवा वेगळया शब्दांत प्रकट करणाऱ्या आहेत. स्त्रियांच्या कवितेची पारंपरिक चौकट मोडणारा सुहासिनी इलैकर यांच्या 'गाथा' (१९७७) हा संग्रह महत्वाचा ठरतो. या संग्रहातील भाषा ही आशयाला साजेशी स्त्रियांच्या नेहमीच्या हळव्या भाषेतून वेगळी आहे. जुन्या पिढीतील या कवयित्रींनी या काळात रचनेचेही अनेक प्रयोग केलेले दिसतात. इंदिरा संत यांनी अष्टाक्षरी छंद काहीसा बाजूला ठेवून मुक्तछंद स्वीकारला. शिरीष पै यांच्या 'हायकू' व शांता शेळके यांची अप्रतिम सुनित रचना हे त्यांचं खास वैशिष्टय होय, याच काळातील काही कवयित्रींनी 'गझल' रचनाही केलेली आहे.

त्याचप्रमाणे मलिका अमर शेख, रजनी परूळेकर यांची काव्यशैली स्फूट भावकवितेसारखी नाही, दोघीचीही कविता आशयाचे विस्तारत जाणारे प्रदेश सूचित करणारी आणि वृत्तीनेच दीर्घत्वाकडे झुकणारी आहे. रजनी परूळेकरांच्या पहिल्या काव्यसंग्रहाचे नावच 'दीर्घ कविता' (१९८५) त्यानंतरचे 'काही दीर्घ कविता' (१९९६) 'पुन्हा दीर्घ कविता' (१९९९) असे आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कवितेतील प्रतिमाविश्वही कोमल किंवा मृदू नाही तर हिंस्त्र, आक्रमक, विद्रूप आणि भयावह आहे. रजनी परूळेकर व मलिका अमर शेख या दोघीचीही कविता शहरी संस्कृतीत गुदमरणाऱ्या संवेदनशील स्त्रीच्या भावविश्वात अखंडपणे सुरू असलेल्या संघर्षाचे, ताणांचे व बाहयविश्वाशी सुरू असलेल्या प्रतिक्रियांचे चित्रण करणारी आहे. रजनी परूळेकर हे ताण चित्रीत करताना मुख्यतः दीर्घ कविता हाच आकृतिबंध स्वीकारतात. सुमती लांडे यांच्या 'वाहते अंतर' त्याचप्रमाणे सुलभा हर्लेकर यांच्या 'सई' (२००६) या कविता संग्रहात दीर्घकाव्याची एक सलग मालिका आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, तीनचार वर्ष मनात घोळत असलेल्या विचारांचे एक मूर्तरूप आहे. ते कथाकाव्य नाही की खंडकाव्यही नाही कोणताही प्रयोग नाही स्त्रीत्वाच्या जाणिवेतून आलेले हे काव्य स्त्रीमुक्ती, स्त्रीवादी, आत्मभान, आत्मसन्मान या सर्वाच्या वाटेवरून जाता-जाता ती सहज जीवनालाच विसरली की काय अशी शंका मनात गोंधळ घालत असताना लक्षात आले की, स्त्री तिच्यातल्या सत्यभावनेला विसरू शकत नाही. तिचे युध्द तिच्याशीच तिच्या स्वतंत्र अस्तित्वासाठी होते. सईला हेच सांगायचेय सुलभा हेर्लेकर यांच्या मताने जरी हा प्रयोग नसला तरी हा एक सुंदर असा सईशी साधलेला दीर्घ संवाद आहे. ही कविता 'सुई' च्या व्यक्तिमत्वाची एकल करणारी नुसतीच दीर्घ कविता नाही तर हे एक अनोखे स्त्रीवादी खंडकाव्य आहे.

अश्विनी धोंगडे यांनी आपल्या स्त्री मुक्तीमधून कविता रचनेसाठी वृत्तपत्रीय शैलीचा वापर केला आहे. कवयित्रींच्या काव्यातील तो एक वेगळाच प्रयोग म्हणावा लागेल. त्यांच्या कवितेची चटकदार, सरळसोट आणि भेदक शैली, वृत्तपत्रीय लेखनाला अधिक जवळची आहे. त्यामुळे सद्यस्थितीतील समाजजीवनाचे वास्तववादी चित्रण चटकन मनावर ठरते. त्यांची 'बातम्या' ही कविता दृष्टीने वैशिष्टयपूर्ण प्रयोग आहे तो असा

**'घरगुती भांडणातून पत्नीचा खून विवाहितेचा छळ आरोपातून सबळ पुराव्या अभावी मुक्तता' -** (अश्विनी धोंगडे, स्त्रीमुक्त)

स्त्री-जीवनाशी निगडीत अशा अनेक बातम्या वृत्तपत्रातून प्रसारीत होत असतात. त्या बातम्याने एक सलग चित्र म्हणजे ही अनोख्या प्रयोगाची कविता सलग अर्थ समोर उभी करणारी एक वेगळी शैली म्हणून ही तिच्याकडे पाहता येतील असे प्रयोग कथा, कादंबऱ्यातून आलेल्या आहेत. परंतु कवितेत असा प्रयोग हा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

वैशिष्टयपूर्णच मानावा लागेल. वृत्तपत्रीय शैलीत काही खास बातम्या ठळक चौकटीत देण्याची पध्दत आहे. अश्विनी धोंगडे यांनी 'अन्वय' या काव्यसंग्रहात हाही प्रयोग केला आहे. या संग्रहातील काही कविता चौकटीत बध्द करून आपले वृत्तपत्रीय शैलीतील काव्य प्रयोग यशस्वी केलेले आहेत.'उपरोध' आणि 'उपहास' हे तर कवयित्रीच्या काव्याचे हत्यारच आहेत. अनेक कवितेतून संस्कृतीचा उपहास करीत त्यावर कठोर प्रहार करीत कवयित्रींच्या कवितेने मी थकभानाचे नवे प्रयोग आपल्या कवितेत केलेले आहेत.

आसावरी काकड यांनी मी एक दर्शनबिंदू (१९९९) मध्ये मूर्तकाव्य रचनेचा प्रयोग केला आहे. डॉ अक्षयकुमार काळे यांनी मूर्तकाव्याबाबत म्हटले आहे की "पाश्चात्य वाङ्.मयात दृश्यललित कलांच्या क्षेत्रातून वाङ्.मयात शिरलेला 'शेप्ड पोएट्री ,'क्राँक्रीट पोएट्री', 'व्हिज्यूयल पोएट्री' इ.काव्यप्रकाराना मराठी 'मूर्तकाव्य' म्हणतात येईल, लघुनियात कालिकात रचनेसंबंधी जसे अनेक प्रयोग करण्यात आले तसा एक वेगळा प्रयोग म्हणून मूर्तकविता म्हणून अस्तित्वात आल्या, तथापि तिचे अस्तित्व र. कृ. जोशी यांच्या मूर्तकवितेपुरते मर्यादित राहिले. " २४ असे त्यांचे म्हणणे असले तरी मराठी कवितेत अधूनमधून मूर्त काव्याचे प्रयोग होतच राहिले. मराठीत मूर्तकाव्याचा प्रयोग प्राचीन कवितेच्या चित्रबंधाशी आपले नाते सांगून जाणारा आहे.मराठवाड्यातील कवी नरेंद्र मारवाडे यांनी 'महाराष्ट्रातील काव्य परिमल' या प्रातिनिधीक काव्यसंग्रहात अशा मूर्तकाव्याचा प्रयोग केला आहे. त्याचा उल्लेख प्रा. डॉ.पृथ्वीराज तौर यांनी १९७५ नंतरच्या मराठवाड्यातील काव्यपरंपरेत प्रा. नरेंद्र मारवाडे यांच्या प्रस्तूत अक्षरबध्द रचनेचा आवर्जून उल्लेख केला आहे. कवयित्रींच्या काव्यात अशा मूर्त काव्याचा प्रयोग 'मी एक दर्शनबिंदू' या कविता संग्रहात आसावरी काकडे यांनीही केला आहे.

कवयित्रींच्या काव्यातील प्रयोगशीलता ही लक्षणीय आहे.मुक्तशैलीचा वापर, अल्पाक्षरता, प्रतिमांची वेगवेगळी रुपे, आत्मपरता, भावनात्मकता व प्रतिमांकन यांना जपतच कवयित्रीच्या काव्याचा आविष्कार करणे कवितेला इष्ठ ठरते. समर्थ प्रतिमा व प्रतीके आपल्या काव्यात साकार करुन पारंपरिक रचनातंत्र पुरुषी काव्यपरंपरेचा व काव्यविचारांचा कळत नकळत पडणारा पगडा कटाक्षाने झुगारुन देण्याचे मनोधैर्य १९८० नंतरच्या कवयित्रींनी जोपासले आहे. कवयित्रीने विद्रोही व आक्रमक बाजूही समर्थपणे पेलली आहे.

**समारोप**

अशाप्रकारे मराठी साहित्यातील कवयित्रींनी काव्यलेखनात भाषा, प्रतिमा, शैली व प्रयोग याचे वेगवेगळे तंत्र वापरले आहे. हा वेगळेपणा निश्चितच मूल्य विचारातून आल्याचे मला वाटते. आपले म्हणणे प्रखर व परखडपणे मांडताना कवयित्री दिसतात. शिवाय अभिव्यक्तीचे वेगळे रुप मांडताना दिसतात. त्यामुळे नवनवीन शैली आणि प्रयोगात भर पडत गेली आहे. असे आवर्जून जाणवते.

**निष्कर्ष**

1. स्त्री कवयित्री म्हणून व्यक्त - अव्यक्त ची गुंफण काव्यरचनेत जाणवते.
2. हि कवयित्री अलंकारिक भाषेचा वापर न करता परखड व रोखठोक भाषा वापरताना दिसते
3. सध्याच्या स्त्री कवितेत रुढी व परंपरेला छेद देऊन धक्का देणारी शैली वापरताना दिसते
4. स्त्री कवयित्रीकडे अनुभवांचा साठा असल्याने छंदोबद्ध रचनेचा विचार न करता मुक्तछंदाचा वापर केलेला दिसतो.
5. नवनवीन शैली, प्रतिमा, प्रयोग यांचा वापर केल्याने अस्सल अनुभव शब्दबद्ध झाला आहे.

**संदर्भ**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*([https://jetjournal.us/](https://jetjournal.us/))*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

1. नेमाडे भालचंद्र, साहित्याची भाषा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९८७, पृ. क्र. २७
2. काळे अक्षयकुमार, अर्वाचीन मराठी काव्यदर्शन, बनहट्टी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९९९, पृ. क्र. ७६३


Copyright © | JET Network, All Rights Reserved